पिंपरी चिंचवड महानगरपालिका
**ग** प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - **७**
सभावृत्तांत

दिनांक - ५/२/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.०५/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.श्री.अभिषेक गोविंद बारणे – सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.डब्बु आसवानी (हिरानंद)
५. मा.पवार मनिषा प्रमोद
६. मा.बारणे अर्चना तानाजी
७. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
८. मा.ऍड.भोसले सचिन सुरेश
९. मा.निलेश हिरामण बारणे
१०. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
११. मा.सविता बाळकृष्ण खुळे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

**श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री**.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.ओंभासे पी एस – कार्यकारी अभियंता,श्री.संदेश चव्हाण – कार्यकारी अभियंता (विद्युत) श्री.मोमीन ए. ए – कनिष्ठ अभियंता, श्री.बोनगीर ए. एम – लेखाकारी, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री.नितीन निंबाळकर , श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.साबळे बी आर- उपअभियंता, श्री.मोहिते एस एस – उपअभियंता जलनि:सारण, श्री.कलाल इ.के,श्री.कोरेवार एम बी, श्री.गजपुरे व्ही पी, श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.सतिष तायडे – विद्युत, श्री.बंडगर एस बी – जलनि:सारण, श्री.संदिप मो.पाडवी

– कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.मगर एस एम – कनिष्ठ अभियंता इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि. ०१/०१/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. ६ ) कायम करणेत आला.

-------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक- १

दिनांक- ५/०२/२०१८

सूचक- मा. कैलास बारणे अनुमोदक – मा.मनिषा पवार

**संदर्भ –** मा.निकिता कदम यांचे दिनांक १/०१/२०१८ चे पत्र..

मा.निकिता कदम यांनी दिनांक १/१/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील राधिका चौक येथे मनपाची मुतारी आहे. सदर ठिकाणाची मुतारी पाडुन सुलभ शौचालय बांधण्यात यावे अशी मागणी सदर परिसरातील नागरीक करत आहेत. तरी प्रभाग क्र.२१ मधील राधिका चौक येथील मुतारी पाडुन सदर ठिकाणी सुलभ पध्दतीने शौचालय बांधण्याचा ठराव माननीय ग प्रभाग समिती मध्ये करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक- २

दिनांक- ५/०२/२०१८

सूचक- मा. कैलास बारणे अनुमोदक – मा. निलेश बारणे

**संदर्भ –** मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक ३०/१२/२०१७ चे पत्र..

मा.संदिप वाघेरे यांनी दिनांक ३०/१२/२०१७ रोजी दिलेल्या पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये पवनेश्वर मंदिरासमोरील जागेमध्ये बहुउद्देशीय सभागृह बांधण्याचे काम नियोजित आहे. सदर जागेच्या शेजारील जागेमध्ये मोकाट जनावरांसाठी कोंडवाडा तसेच शिल्प उभारण्यात आलेले आहे. परंतु सद्यस्थितीमध्ये या दोन्हीही जागेचा वापर होतांना दिसत नाही. मोकाट जनावरांचा कोंडवाडा तर महापालिकेने नाममात्र भाडेतत्वावर भाडयाने दिला होता. आज ती जागा भाडेकरार संपुष्टात येऊन महापालिकेच्या ताब्यामध्ये आलेली आहे. तसेच शिल्प फक्त उभारायचे म्हणुन उभारण्यात आलेले आहे. त्या जागेची संकल्पना आजही पिंपरी गावातील नागरिकांच्या लक्षात आलेली नाही. तरी आपण नियोजित सभागृहामध्ये सदरच्या जागा विलीन करण्यात याव्यात जेणे करुन प्रभागातील मध्यम वर्गीय, गरजु कष्टकरी कुटुंबांना याचा लाभ घेणेत येईल. सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ३

दिनांक- ५/०२/२०१८

सूचक- मा.निलेश बारणे अनुमोदक – मा.संदिप वाघेरे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.गक्षे/स्था/कावि/२५७/२०१८ दि.३१/०१/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.गक्षे/स्था/कावि/२५७/२०१८ दि.३१/०१/२०१८ चे नुसार प्रभाग क्र.२४ मधील डांगे चौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाजवळ उभारण्यात येणा-या शिवसृष्टीमध्ये पाण्याच्या टाकी शेजारी ग्रंथालय उभारणेबाबत मा.नगरसेवक यांनी मागणी केली आहे, तरी सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - ४

दिनांक- ५/०२/२०१८

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.बाबासाहेब त्रिभुवन

संदर्भ – मा.कैलास बारणे यांचे दिनांक ५/०२/२०१८ चे पत्र

मा.कैलास बारणे यांनी दिनांक ५/०२/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार श्री.संजय बाजीराव मरकड हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात चिंचवड मतदार संघनिहाय विद्युत वितरण समिती मध्ये संदर्भिय आदेशान्वये नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यांनी त्यांचे चार नामफलक लावणेबाबत मागणी केलेली आहे. तरी सदरचा नामफलक लावणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक - ५

दिनांक- ५/०२/२०१८

सूचक- मा.निलेश बारणे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.निलेश बारणे यांचे दिनांक ५/०२/२०१८ चे पत्र

मा.निलेश बारणे यांनी दिनांक ५/०२/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार डांगे चौक ते चिंचवड रोडवरील दत्त नगर येथील मोरया मंगल कार्यालयासमोरील चौकास सद्यस्थितीत कोणतेही नाव नाही. त्यामुळे जवळच्या नागरिकांना पत्ता सांगण्यास गैरसोय होत आहे. तरी सदरच्या चौकास " बारणे चौक" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक - ६

दिनांक- ५/०२/२०१८

सूचक- मा.मनिषा पवार अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.मनिषा पवार व मा.कैलास बारणे यांचे दि. ५/०२/२०१८ चे पत्र

ग क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.२३ येथे निविदा क्र.स्थापत्य/ब प्रभाग/५/२२/२०१७-१८ कामाचे नाव – प्रभाग क्र.२३ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे या प्रभाग क्र.२३ मधील चालु असलेल्या निविदा कामामधुन संपुर्ण ग क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामध्ये अतिक्रमण कारवाई करणेकामी

मशिनरी वापराबाबत मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

दि.५/०२/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.

मा.निलेश बारणे – डांगे चौक येथे अनेक हातगाडया आहेत, त्यावर कारवाई करण्यात यावी. तसेच पुलाच्या खाली जाहिरातींचे स्टीकर्स लावलेले आहेत, त्याबाबत कारवाई होणे अपेक्षित आहे. मागील सभेमध्ये देखील सदर विषयाबाबत चर्चा होऊनही याबाबत कारवाई झालेली दिसुन येत नाही. सदर जाहिरात चिकटवणा-यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा. ज्यामुळे अशाप्रकारचे स्टीकर्स पुन्हा लावले जाणार नाही. हातगाडयांचे संदर्भात अतिक्रमण विभागाने खुलासा द्यावा.

श्री.श्रीनिवास दांगट – अतिक्रमण पथक प्रमुख हे रजेवर आहेत. गेल्या सहा महिन्यापासुन अतिक्रमण कारवाई सुरु आहे.

ऑगस्ट २०१७ ते ३१ जानेवारी २०१८ अखेर अतिक्रमण पथकाने केलेल्या कारवाईचा प्रत्येक महिन्यानुसार सविस्तर माहिती/गोषवारा वाचुन दाखविणेत आला. फ्लेक्स/बॅनर्स/हातगाडया यावर केलेल्या कारवाईची माहिती दिली.

| महिना /वर्ष | हटविण्यात आलेल्या हातगाडया | हटविण्यात आलेले पथारिवाले | काढणेत आलेले फ्लेक्स | जप्त केलेले साहित्य | खाद्यपदार्थ/भाजीपाला विक्री वाहनावर केलेली कार्यवाही | वसुल केलेला दंड |
|---|---|---|---|---|---|---|
| ऑगस्ट २०१७ ते जानेवारी २०१८ | २३२२ | ११९२ | १०८० | २९१ | ५ | १,६४,३००/- |

श्री.बाबासाहेब त्रिभुवन – नखाते वस्ती व तापकीरनगर येथील बस स्टॉपसमोर अनेक हातगाडया असतात, त्यावर कारवाई करायला हवी. सदर ठिकाणी रोजच्या रोज कारवाई करणे गरजेचे आहे.

श्रीमती निकीता कदम - जिजामाता हॉस्पिटल चौक येथे अनेक अनधिकृत टप-या आहेत, त्यावर कारवाई करा.( काळेवाडीकडे जाणारा रस्ता)

श्री.अभिषेक बारणे – ६ लोकांमध्ये कारवाई होणे शक्य नाही त्यामुळे काही ठिकाणी अतिक्रमण कारवाई झाली आहे तर काही ठिकाणी अतिक्रमण कारवाई करणे मनुष्यबळाअभावी होणे शक्य नसते. एखाद्या वॉर्ड नुसार एखाद्या एजन्सीला काम Contract पध्दतीने देण्यात येऊन सदरचे काम सोपे होऊ शकेल. यानुसार आयुक्तांना पत्र देण्यात यावे.

श्रीमती स्मिता झगडे (सहा.आयुक्त) – सदरचे काम Contract पध्दतीने करणेबाबत आपण मांडलेला मुद्दा चांगला आहे. अतिक्रमणासंदर्भात कडक कारवाई करण्यासाठी आपल्याकडे मनुष्यबळ अपुर्ण आहे. स्थापत्य विभागाकडे तरतुद शिल्लक असेल तर ३ स्पॉट आहेत जेथे हॉकर्स लागतात

श्री.सचिन भोसले - महापालिकेने ज्या हॉकर्सला प्रमाणपत्र दिलेले नाही त्यावर कार्यवाही करा. अतिक्रमणाच्या ठिकाणावर जर कुणी मारहाण करीत असेल तर त्यावर कर्मचा-याने गुन्हा

दाखल करायला हवा.

श्रीमती स्मिता झगडे (सहा.आयुक्त) – प्रत्येक कर्मचारी हा सक्षम असतो.

श्री.ओंभासे पी.एस – स्टाफ व वाहन टेंडरव्दारे पुरवणार आहोत.

श्री.निलेश बारणे – मुख्य कार्यालयाकडे काम लवकर होत नाही परंतु प्रभाग स्तरावर काम लवकर होईल याकरीता प्रभाग स्तरावर टेंडर करण्यात यावे.

श्री.ओभासे पी एस – त्यासंदर्भात तरतुद ठेवलीये. आता अंदाजपत्रकात नाहीये पण तरतुद टाकुन टेंडर काढु शकतो.

श्रीमती स्मिता झगडे (सहा.आयुक्त) - ऐन वेळी पोलिसांची मदत मिळत नाही. श्री.बोडके साहेबांनी २ पोलिस दिलेले आहेत, परंतु त्यांना बोलवले असता ते मोठया कारवाई साठी गेलेले असतात, ते बिझी असतात त्यामुळे ते येत नाही ही एक अडचण आहे.

श्री.संदिप वाघेरे - अतिक्रमण कारवाईसाठी माणसे, आवश्यक साहित्य तसेच यंत्रसामुग्री पुरविणेकामी एक विषय समितीमध्ये मंजुर करुन घ्यावा.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष<br>
ग प्रभाग समिती<br>
थेरगाव– ३३.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३<br>
क्र-गक्षेका/कावि/४/ /२०१८<br>
दिनांक - /०२/२०१८

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)<br>
क्षेत्रीय कार्यालय,<br>
थेरगाव – ३३

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.